४) सर्व संलग्नित महाविद्यालयातील अध्यापनाचे कामकाज दि. १६.०३.२०२० ते दि. ३१.०३.२०२० पर्यंत बंद राहील. तथापि, अध्यापना व्यतिरीक्त इतर शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय कर्मचारी यांनी नेहमीप्रमाणे कार्यालयात कार्यालयीन वेळेनुसार उपस्थित रहावे.

५) आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी संबंधित प्राचार्य, संचालक व विभागप्रमुख यांनी घ्यावी.

६) यासंदर्भात विद्यापीठाने परिपत्रक क्र. ९७/२०२०, परिपत्रक क्र. १३२/२०२० तसेच दि. २५.०२.२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये कोरोना या आजाराबाबतच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या अंमलबजावणीबाबत कळविण्यात आलेले आहे. सदर परिपत्रकांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

७) विद्यापीठ / महाविद्यालय परिसरातील व्यायाम शाळा (जीम), जलतरण तलाव इत्यादी उपरोक्त कालावधीसाठी बंद ठेवण्यात यावे.

आदेशावरुन,

15/03/2020

(प्रा. भा. व्यं. पवार)
**प्र. कुलसचिव**

जा.क्र.कबचौउमवि/२/कोरोना(कोव्हीड-१९)/१४६/२०२०
दि. १५.०३.२०२०

**सोबत :-** संदर्भीय पत्रांच्या छायांकित प्रती.

प्रति,

१. विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक/विभागांचे प्रमुख,
२. प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य/मा.संचालक.
३. सर्व प्रशासकीय विभागांचे विभाग प्रमुख/नियंत्रक अधिकारी, कबचौउमवि., जळगाव.
४. मानद संचालक, प्रस्तुत विद्यापीठाचे प्रताप तत्वज्ञान केंद्र, अमळनेर.
५. कार्यकारी संचालक, प्रस्तुत विद्यापीठाचे महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे.
६. नियंत्रक अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठाचे एकलव्य प्रशिक्षण केंद्र, नंदुरबार.
७. मा.रेक्टर/वसतिगृह अधिक्षीका/सहायक वसतिगृह अधिक्षक, मुलांचे व मुलींचे वसतिगृह, प्रस्तुत विद्यापीठ

**प्रत माहितीसाठी.**

१. मा. कुलगुरू महोदय यांचे कार्यालय
२. मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय
३. मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
४. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव.
५. उपकुलसचिव, प्रशासन विभाग, कबचौउमवि., जळगाव.

